# शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे

# इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२६-२७

**वेबसाईट:** https://mahafyjcadmissions.in

**हेल्पलाईन:** 8530955564 I **ईमेल:** support@mahafyjcadmissions.in

**FAQs/ वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि त्यांची उत्तरे**

1. **इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया म्हणजे काय?**

   महाराष्ट्र राज्यामध्ये राज्य मंडळाशी संलग्न उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता ११ वी साठी ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांच्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठी व प्रवेश मिळवण्यासाठी दिलेली ही केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसाठीची वेबपोर्टल सुविधा आहे. इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी ही केंद्रीय ऑनलाईन प्रणाली आहे.

2. **११ वी प्रवेशासाठी कोण अर्ज करू शकतो?**

   जे विद्यार्थी कोणत्याही मान्यताप्राप्त मंडळामधून इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेले आहेत व राज्यमंडळाशी संलग्न उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता अकरावी मध्ये प्रवेश घेऊ इच्छितात ते यासाठी अर्ज करू शकतात.

3. **ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य आहे काय?**

   होय, ऑफलाईन अर्ज मान्य केले जाणार नाहीत.

4. **ऑनलाइन नोंदणी कशी करावी? लॉगिन आयडी व पासवर्ड कसा मिळतो?**

   यासाठी https://mahafyjcadmissions.in या वेबपोर्टलला भेट द्या, विद्यार्थी नोंदणी साठी Student Registration वर क्लिक करा, आवश्यक माहिती भरा आणि पासवर्ड तयार करा. Login ID तुम्हाला SMS द्वारे मिळेल. नोंदणी करताना निवडलेल्या सुरक्षा प्रश्नांचे (सिक्युरिटी प्रश्नाचे) उत्तर लक्षात ठेवा सिक्युरिटी प्रश्न व पासवर्ड याची प्रिंट घ्या व जपून ठेवा.

5. **नोंदणी नंतर प्रवेश अर्जात सुधारणा करता येते का?**

**होय, आपल्या अर्जाच्या पडताळणीपूर्वी Unlock Form पर्याय वापरून किंवा मार्गदर्शन केंद्राशी संपर्क करून आपल्या प्रवेश अर्जात सुधारणा करता येते.**

6. **मी किती उच्च माध्यमिक विद्यालयांची पसंती देऊ शकतो?**

**विद्यार्थी किमान १ व जास्तीत जास्त १० उच्च माध्यमिक विद्यालयांचे पसंतीक्रम नोंदवू शकतो.**

7. **प्रवेशासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत?**

**इयत्ता १० वी चे गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला आणि आवश्यकतेनुसार आरक्षण संदर्भात व विशेष प्रवर्गाची प्रमाणपत्रे ( प्रवेश माहितीपुस्तिकेत नमूद केल्यानुसार प्रकरण सहा )**

8. **मी इतर मंडळाचा विद्यार्थी आहे. मी काय करू?**

**अन्य मंडळाचे विद्यार्थीही सामान्यपणे ऑनलाईन अर्ज करू शकतात. त्यांनी आपले इयत्ता दहावीचे गुण व्यवस्थित भरावेत आपला अर्ज भरून लॉक करा व व्हेरिफाय करा. इयत्ता दहावी गुणपत्रिकेमध्ये केवळ श्रेणी नमूद असतील तर श्रेणीचे रूपांतर गुणांमध्ये आपल्या शाळेच्या मदतीने करून घ्या व ते अर्जामध्ये नोंदवा. यासाठी आपली शाळा किंवा मार्गदर्शन केंद्र यांची मदत घेऊ शकता. जवळचे केंद्र शोधण्यासाठी पोर्टलवर माहिती पहा.**

9. **एटी-केटी सवलत कोणाला लागू आहे आणि अशा विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेशासाठी अर्ज केव्हा भरावा?**

**ATKT प्राप्त विद्यार्थ्यांनी पुढील दक्षता घ्याव्यात.**

**इयत्ता १० वी मध्ये १ किंवा २ विषयांमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना इ.११ वी प्रवेशासाठी शासनाने ATKT (Allowed to Keep Terms) सवलत लागू केलेली आहे.**

**ही सवलत केवळ महाराष्ट्र राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांसाठी लागू आहे. अशा विद्यार्थ्यांना राज्य मंडळाचा इयत्ता अकरावी मध्ये (इयत्ता दहावी सर्व विषय उत्तीर्ण होईपर्यंत) तात्पुरता प्रवेश दिला जातो.**

**ATKT धारक विद्यार्थ्यांना ११ वी प्रवेशासाठी अर्ज करण्याची सोय इयत्ता दहावी (जुलै मधील) पुरवणी परीक्षेच्या निकालानंतर (साधारणपणे विशेष फेरी 1 नंतर) दिली जाईल.**

**ज्या विद्यार्थ्यांना ATKT सवलत मिळालेली आहे त्यांना ११ वी प्रवेशासाठी अर्ज भरता येतील. (इंग्रजी विषयात ATKT असेल तरीही) भविष्यात इंग्रजी विषय उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.**

**ATKT धारक विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी मध्ये विज्ञान शाखा घ्यावयाची असल्यास इयत्ता दहावी मध्ये विज्ञान विषयात ४० टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे.**

**अन्य मंडळांच्या विद्यार्थ्यांनाही त्या मंडळाने अशा प्रकारची (eg. Compartmental) सवलत लागू केली असल्यास ती त्याच मंडळाच्या इयत्ता अकरावी प्रवेशासाठी लागू असेल. राज्य मंडळातील इयत्ता अकरावी प्रवेशासाठी अन्य मंडळाची ATKT सवलत लागू होणार नाही. त्यामुळे अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना स्पष्ट उत्तीर्ण झाल्याशिवाय राज्यमंडळ इयत्ता ११ वी प्रवेशासाठी अर्ज करता येणार नाही.**

10. **कोटा प्रकार कोणते आहेत?**

**इन-हाऊस कोटा (१०%),**

**व्यवस्थापन कोटा (५%),**

**अल्पसंख्याक कोटा (५०%) केवळ अल्पसंख्याक विद्यालयांमध्ये**

11. **कोटा जागांसाठी ही ऑनलाइन अर्ज आवश्यक आहे का?**

**होय, सर्वप्रकारच्या कोट्या अंतर्गत प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज आवश्यक आहे.**

12. **प्रवेशासाठी किती फेऱ्या घेतल्या जातात?**

**चार नियमित फेऱ्या व त्यानंतर सर्वांसाठी खुली फेरी (Open to All Round).**

13. **प्रथम पसंतीचे विद्यालय मिळवूनही प्रवेश निश्चित केला नाही तर काय होईल?**

**जर विद्यार्थ्यास प्रथम पसंतीचे उच्च माध्यमिक विद्यालय मिळाले तरीही प्रवेश घेतला नाही, तर संबंधित विद्यार्थी पुढील सर्व नियमित फेऱ्यांसाठी अपात्र ठरेल.**

14. **मी एकापेक्षा अधिक फेऱ्यांमध्ये सहभागी होऊ शकतो का?**

**आपणास इयत्ता अकरावी मध्ये प्रवेश मिळेपर्यंत आपण प्रत्येक फेरीमध्ये सहभागी होऊ शकता त्यासाठी प्रत्येक फेरीपूर्वी आपला अर्ज भाग एक व दोन भरून लॉक करणे आवश्यक आहे**

15. **नोंदणी फी किती आहे आणि ती कशी भरावी?**

**प्रवेश नोंदणी प्रक्रिया शुल्क फी ₹१०० आहे. ती Net Banking, Debit/Credit Card, UPI किंवा डिजिटल वॉलेटद्वारे ऑनलाईन भरावी लागेल.**

16. **ऑफलाइन पेमेंटचा पर्याय उपलब्ध आहे का?**

**नाही, फक्त ऑनलाईन पेमेंटच स्वीकारले जाते.**

17. **जर मी लॉगिन तपशील विसरलो तर?**

**यासाठी Forgot Password पर्याय वापरा किंवा जवळच्या मार्गदर्शन केंद्राशी संपर्क करा.**

18. **विद्यार्थ्याला प्रवेश अर्ज संदर्भात अडचणी संदर्भात कुठे मदत मिळेल?**

**शाळा, जवळचे मार्गदर्शन केंद्र, हेल्पलाईन (८५३०९५५५६४) किंवा ईमेल support@mahafyjcadmissions.in यांच्याशी संपर्क करा**

19. **मी उच्च माध्यमिक विद्यालयाचा प्राधान्यक्रम बदलू शकतो का?**

होय, प्रत्येक फेरीपूर्वी तुम्ही तुमचा अर्जाचा पसंतीक्रम भाग 2 (Option Form (Part-2)) अद्ययावत करू शकता

20. प्रवेश यादीत नाव आल्यावर लगेच प्रवेश निश्चित होतो का?

नाही, यासाठी विहित कालावधीत Proceed for Admission वर क्लिक करा, आवश्यक कागदपत्रे अपलोड करा व संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयास भेट देऊन कागदपत्रांची पडताळणी झाल्यावर व विहित शैक्षणिक शुल्क भरल्यानंतर व संबंधित विद्यालयाने प्रवेश निश्चित केल्यावरच आपला प्रवेश निश्चित होतो.

21. प्रवेश प्रक्रियेतून माघार घेण्यासाठी काय करता येईल?

यासाठी पोर्टलवरील Withdrawal of application पर्याय वापरा यामुळे आपली एक जागा इतर विद्यार्थ्यांसाठी मोकळी होईल

22. मूळ कागदपत्रांची पडताळणी कोण करेल?

जे उच्च माध्यमिक विद्यालय तुम्हाला प्रवेशासाठी मिळाले आहे, तेच उच्च माध्यमिक विद्यालय आपण अपलोड केलेल्या कागदपत्रांशी तुलना करून, आपल्या मूळ कागदपत्रांची पडताळणी करेल

23. मी माझ्या प्रवेश अर्जातील शाखेची निवड बदलू शकतो का?

जर तुम्ही प्रवेश घेतलेला नसेल, तर तुम्ही पुढील फेरीपूर्वी तुमच्या अर्जामध्ये शाखेचा पर्याय व उच्च माध्यमिक विद्यालयांचा प्राधान्यक्रम बदलू शकता

24. जर अर्जातील माहिती व मूळ कागदपत्रातील माहिती वेगळे आढळली तर?

अशा प्रकरणांमध्ये विद्यार्थी नियमित फेऱ्यांमधून अपात्र ठरेल व त्याला फक्त Open to All फेरीमध्ये सहभागी होण्याची संधी देण्यात येईल

25. इयत्ता दहावीचे गुणपत्रक बनावट फेरफार गेलेले आहे असे आढळल्यास?

अशा विद्यार्थ्याला शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेश प्रक्रियेत सहभाग घेण्यापासून प्रतिबंधित केले जाईल आणि गुणपत्रक बनावट ठरल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल

26. **शून्य फेरी झिरो राऊंड म्हणजे काय?**

**सदर फेरी नियमित फेऱ्या सुरू होण्यापूर्वी आयोजित करण्यात येईल या फेरीमध्ये केंद्रीय प्रवेशाचे कोणतेही प्रवेश होणार नाहीत, केवळ कोटांतर्गत प्रवेशाची अनुमती दिली जाऊ शकेल. या फेरी दरम्यान सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करणे, शंका समाधान, पूर्वतयारी अर्ज भरून घेणे इत्यादी कामकाज केले जाईल**

27. **रात्र शाळेत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया लागू आहे का?**

**नाही**

28. **ओपन टू ऑल फेरी म्हणजे काय?**

**ही एक विशेष फेरी असेल यामध्ये प्रवेश केवळ गुणवत्तेनुसार व विद्यार्थ्यांच्या पसंती क्रमानुसार केले जातील यामध्ये आरक्षण लागू असणार नाही. विशेष फेऱ्या साधारणपणे चार नियमित फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर आयोजित केली जाईल. आवश्यकतेनुसार एकापेक्षा अधिक विशेष फेऱ्या आयोजित केल्या जाऊ शकतात. अशा विशेष फेऱ्यांमध्ये अद्याप प्रवेश न मिळालेले विद्यार्थी तसेच नियमित फेरी दरम्यान प्रतिबंधित केले विद्यार्थी सहभागी होऊ शकतील.**

29. **यावर्षी एच एस व्ही सी प्रवेश कसे होणार आहेत?**

**ऑफलाईन पद्धतीने उच्च माध्यमिक विद्यालय स्तरावरून गुणवत्तानुसार करण्यात येतील.**

30. **मूळ कागदपत्रे केव्हा जमा करावी?**

**प्रवेशाचा अर्ज भाग एक भरताना आपणाकडे असलेली कागदपत्र अपलोड करावीत व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रत्यक्ष प्रवेश घेताना सर्व मूळ कागदपत्रे विद्यालयाने सांगितल्यानुसार जमा करावी**

31. **खेळाडूंसाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत?**

**खेळाडू विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रियेमध्ये आरक्षण आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक विजेते व सहभागाचे प्रमाणपत्र असलेले विद्यार्थी पात्र आहेत. तसेच राष्ट्रीय स्तरावरील केवळ पदक विजेते**

**विद्यार्थी पात्र आहेत. या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आपणास संबंधित स्पर्धेमध्ये मिळालेले प्रमाणपत्र हे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्रमाणित केलेले सादर करणे आवश्यक आहे.**

32. **नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र नसेल तर काय करावे लागेल?**

**नॉन क्रिमीलेअर अर्थात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र VJ, NT, OBC, SBC, SEBC प्रवर्गाच्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असते. सदर प्रमाणपत्र अर्ज भरताना उपलब्ध नसले तरी प्रवेशा वेळेपर्यंत काढून घेणे आवश्यक आहे. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांना नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र मिळणार नसेल तर त्यांनी खुल्या प्रवर्गातून अर्ज भरण्याचा पर्याय निवडावा.**

33. **दाखला देताना दाखल्यावर कोणती तारीख टाकायची?**

**इयत्ता दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला या दिवशी दिला, त्या दिवशीची तारीख त्या दाखल्यावर येईल परंतु शाळा सोडल्याची तारीख ही इयत्ता दहावीचा निकाल लागण्याची तारीख असेल. दाखल्यावर तारीख नमूद करण्याची जबाबदारी संबंधित शाळेची आहे त्यामुळे याबाबत विद्यार्थ्यांनी काळजी करण्याची आवश्यकता नाही.**

34. **डॉक्युमेंट फाईल ची साईज किती एमबी असावी?**

**प्रवेश अर्ज भरताना अपलोड करावयाच्या कागदपत्रांसाठी प्रत्येक फाईलचा (डॉक्युमेंटचा) आकार जास्तीत जास्त 1 MB पर्यंत असावा.**

35. **ओपन स्कूल विद्यार्थ्यांसाठी शाळा सोडल्याचा दाखला नसेल तर काय करावे?**

**NIOS ओपन स्कूल मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्या मंडळाचे उत्तीर्ण प्रमाणपत्र दिले जाते. त्यासोबत यापूर्वी आपण जी इयत्ता (उदा 9 वी) उत्तीर्ण केलेली आहे त्या इयत्तेचा शाळा सोडल्याचा दाखला संबंधित शाळेकडून घ्यावा व प्रवेशावेळी दोन्ही कागदपत्रे सादर करावीत.**

36. **घेतलेला प्रवेश रद्द करता येऊ शकतो का?**

होय. प्रवेश प्रक्रिया चालू असताना कोणत्याही टप्प्यामध्ये आपण घेतलेला प्रवेश रद्द करता येऊ शकतो.

37. **स्वातंत्र्यसैनिक पाल्यांसाठी आवश्यक कागदपत्रे कोणती?**

स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आरक्षणाचा लाभ घ्यायचा असल्यास त्या पाल्यास स्वातंत्र्यसैनिकांनी नामनिर्देशित केले असले पाहिजे तसे व स्वातंत्र्यसैनिक असल्याबाबतचे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

38. **अनाथ मुलांसाठी आवश्यक कागदपत्र कोणते?**

अनाथ विद्यार्थ्यांनी विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास विभाग यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

39. **परदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक कागदपत्रे कोणती?**

संबंधित देशातील भारतीय दूतावासाचे संबंधित अधिकारी यांचे सही व शिक्का असलेले दाखला व गुणपत्रक सादर करावे दाखला व गुणपत्रक इंग्रजी भाषेतील असावे. परदेशी रहिवासी असणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणतेही सामाजिक/वैधानिक आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

40. **महाराष्ट्र राज्य व्यतिरिक्त राज्यातील विद्यार्थ्यांचे गुण कसे नोंदवावे?**

महाराष्ट्र राज्या व्यतिरिक्त अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना सर्वोत्तम पाच Best 5 विषयांचे गुण प्रवेश प्रक्रियेमध्ये नोंदवता येतील तथापि सर्वोत्तम पाच Best 5 विषय निवडताना त्यामध्ये अतिरिक्त अथवा वैकल्पिक विषयाचा समावेश करू नये.

उदाहरणादाखल -

CBSE कडील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर सहा विषय नमूद आहेत पहिले पाच अनिवार्य सर्वोत्तम पाच साठी गृहीत धरावेत सहावा अतिरिक्त विषय सर्वोत्तम पाच साठी गृहीत धरू नये.

याचप्रमाणे ICSE साठी तिसऱ्या गटातील विषय गृहीत धरू नयेत.

ज्या मंडळाच्या गुणपत्रिकेवर सात पेक्षा जास्त विषय नमून आहेत त्या बाबतीमध्ये अतिरिक्त वैकल्पिक विषय वगळून विज्ञान विषयांचे स्वतंत्र तीन (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) विषय नमूद असतील तर या तीन विषयांचे गुण एकत्र करून विज्ञान एकच विषय म्हणून विज्ञान साठी शंभर पैकी गुण रूपांतरित करावेत.

याशिवाय वैकल्पिक अतिरिक्त विषयाचे गुण वगळून सर्वोत्तम पाच विषयाचे गुण नोंदवावेत .

याच पद्धतीने अन्य राज्याच्या व अन्य देशांच्या मंडळांच्या बाबतीत कार्यपद्धती अवलंबावी.

41. विज्ञान शाखेसाठी मराठी माध्यम दिसत आहे ते इंग्रजी असायला हवे ना, काय करावे?

विज्ञान शाखा ह्या मराठी माध्यमाच्या तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये सुरू आहेत. पोर्टलवर विज्ञान शाखेसाठी दाखवण्यात येणारे माध्यम हे शाळेचे माध्यम आहे. सर्वसाधारणपणे विज्ञान शाखेमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित, IT, Bifocalअसे विषय इंग्रजी मधूनच शिकविले जातात. त्यामुळे विज्ञान शाखेचे माध्यम इंग्रजी व मराठी वेगवेगळे असले तरी वरील चार विषय इंग्रजी मधूनच शिकवले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी दोन्ही पैकी कोणतेही माध्यम निवडले तरी चालू शकते. तथापि यासाठी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाशी संपर्क करून अधिक माहिती मिळवता येईल.

42. उच्चतम पाच विषयाचे गुण ग्राह्य मानताना कला व क्रीडा प्राविण्याबद्दल मिळणारे ज्यादा गुण विचारात घेता येतील काय?

राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना इयत्ता दहावी मध्ये कला व क्रीडा प्रविण्याबद्दल देण्यात येणारे जादा गुण हे कोणत्याही एका विषयांमध्ये समाविष्ट असत नाहीत. शासन निर्णय दि. १० मे २०२५ मधील तरतुदी नुसार इयत्ता ११ वी प्रवेशासाठी उच्चतम ५ विषयांचे गुण विचारात घेण्यात येतील. सबब, कला व क्रीडा प्रविन्याबद्दल मिळणारे जादा गुण गुणवत्ता यादीसाठी एकुणात समाविष्ट करता येणार नाहीत.

43. मी राज्य मंडळाचा मार्च 2025 मधील दहावी परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी असून माझ्या गुणपत्रिकेवर आईचे नाव नमूद नाही. मी प्रवेशासाठी रजिस्ट्रेशन कसे करू शकतो?

राज्य मंडळाच्या दहावीच्या ज्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर अथवा राज्य मंडळाच्या माहितीमध्ये आईचे नाव नमूद केलेले नाही, अशा विद्यार्थ्यांनी आईचे नाव या ठिकाणी XXXX असे टाकावे, आपला बैठक क्रमांक व आईचे नाव या ठिकाणी XXXX टाकल्यानंतर आपली सर्व माहिती आपल्याला उपलब्ध होईल.

44. माझ्या प्रवेश अर्जात माझ्याकडून चुकीचा मोबाईल नंबर, चुकीचा ईमेल आयडी टाकला गेला आहे. तो मी कसा बदलू शकतो?

ज्या विद्यार्थ्यांना आपल्या प्रवेश अर्जात नमूद मोबाईल नंबर ,/ ईमेल आयडी याच्यामध्ये बदल करावयाचा आहे अशा विद्यार्थ्यांना आवश्यक बदल करून देण्याची सुविधा विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी आपल्या विभागाच्या विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाशी संपर्क साधावा.

45. सीबीएससी मंडळाच्या दहावी मधील अतिरिक्त विषयाचे गुण एकूण केव्हा पकडता येतील?

CBSE अतिरिक्त (additional 6th) विषयाचे गुण खालील दोन परिस्थितीमध्ये एकुणात ग्राह्य ठरतील.

1. जर विद्यार्थी मूळ पाच विषयांपैकी एक भाषा विषय अनुत्तीर्ण झाला असेल आणि अतिरिक्त (additional) विषय गटामध्ये त्याने तिसरी भाषा घेतलेली असेल आणि ती उत्तीर्ण असेल त्या परिस्थितीत वरील पाच विषयातील अनुत्तीर्ण झालेल्या भाषेऐवजी अतिरिक्त विषयातील उत्तीर्ण झालेल्या भाषेचे गुण ग्राह्य मानावेत. मूळ उत्तीर्ण चार व अतिरिक्त भाषा एक अशा पद्धतीने पाच विषयांचे गुण एकत्र करावेत. (CBSE ने त्या विद्यार्थ्यास उत्तीर्ण केले असणे आवश्यक)
2. जर एखाद्या विद्यार्थ्याला मंडळाकडून भाषा विषयांमधून सूट (Exempted) मिळाली असेल आणि तसे गुणपत्रिकेत नमूद असेल, तर मूळ पाच विषयांपैकी त्या विद्यार्थ्याला चारच विषय असतील, अशावेळी अतिरिक्त गटातील विषय असल्यास त्याचा समावेश करून मूळ चार व अतिरिक्त एक असे पाच विषयांचे गुण एकत्र करावेत. (CBSE ने त्या विद्यार्थ्यास उत्तीर्ण केले असणे आवश्यक)

तथापि, इंग्रजी भाषा विषयासाठी सूट (Exemption) घेतलेली असल्यास अथवा English अनुत्तीर्ण असल्यास अशा विद्यार्थ्याला इयत्ता 11 वी मध्ये प्रवेश घेता येणार नाही. तसेच COMPARTMENTAL शेरा असलेले विद्यार्थी उत्तीर्ण नाहीत त्यामुळे त्यांनाही 11वी प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

सीबीएससी मंडळाच्या विद्यार्थ्यांनी मूळ विषय गटातील पाचही विषय उत्तीर्ण केलेले असतील तर अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीमध्ये प्रवेशासाठी गुणांची एकूण करताना सहावा अतिरिक्त additional) विषयांचे गुण ग्राह्य मानू नयेत. केवळ मूळ (Basic) पाच विषयांचेच गुण एकत्र करावेत.

46. आयसीएसई परीक्षेतील गुण अकरावी प्रवेशासाठी नोंदवताना कोणती दक्षता घ्यावी?

CISCE मंडळाच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीचे गुण नोंदविताना पुढील कार्यपद्धती अवलंबावी

ICSE परीक्षेमध्ये विद्यार्थी गट एक मधील 3, गट दोन मधील 2 किंवा 3 व गट तीन मधील 1 (ऐच्छिक) अशा पद्धतीने पाच, सहा किंवा सात विषय घेऊन उत्तीर्ण होतात. अकरावी प्रवेशासाठी गुण नोंदविताना विषय गट एक व गट दोन मधील विषयांपैकी सर्वोच्च गुण असलेल्या कोणत्याही पाच विषयांचे गुण ग्राह्य धरावेत.

जर एखाद्या विद्यार्थ्याला मंडळाकडून गट एक मधील भाषा (second) विषयांमधून सूट (Exempted) मिळाली असेल किंवा विद्यार्थ्यांचे गट अ व गट ब मिळून पाचच विषय असतील तर, अशावेळी त्या पाच विषयांचे गुण नमूद करावेत. (CISCE ने त्या विद्यार्थ्यास उत्तीर्ण केले असणे आवश्यक)

विद्यार्थ्यांचे गट एक व गट दोन मिळून चारच विषय असतील आणि गट तीन मधील 1 विषय असेल तर गट तीन मधील विषयासह पाच विषयांचे गुण नमूद करावेत.

CISCE मंडळाकडे उत्तीर्णतेच्या निकषानुसार विद्यार्थी आणि चार विषय उत्तीर्ण केले तरी तो उत्तीर्ण होतो. त्यामुळे गट अ व गट ब मधील विषय मिळून पाचच विषय असतील व त्यामधील एका विषयात अनुत्तीर्ण असेल तरीही त्या पाच विषयांचेच गुण नमूद करावेत (CISCE ने त्या विद्यार्थ्यास उत्तीर्ण केले असणे आवश्यक) गट तीन मधील विषयांचे गुण समाविष्ट करू नयेत

इंग्रजी भाषा विषयासाठी सूट (Exemption) घेतलेली असल्यास अथवा English अनुत्तीर्ण असल्यास अशा विद्यार्थ्याला इयत्ता 11 वी मध्ये प्रवेश घेता येणार नाही.

47. इयत्ता अकरावी प्रवेशासाठी अर्ज करण्याची मुदत संपली आहे. मग नवीन विद्यार्थ्याला अर्ज कसा करता येईल?

इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये ऑनलाइन अर्ज करण्यासाठी प्रत्येक फेरीपूर्वी विद्यार्थ्यांना संधी दिली जाते. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचा Student Registration, Part-१, Part-२ असा कोणताही फॉर्म भरणे बाकी असेल तर त्या विद्यार्थ्याला विद्यमान प्रवेश फेरी संपल्यानंतर त्यापुढील प्रवेश फेरीच्या सुरुवातीस अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध होईल. यावेळी नवीन विद्यार्थी सुद्धा अर्ज भरून System मध्ये येऊ शकतील. अर्ज भरण्याच्या मदतीबाबत कालावधी समजून घेण्यासाठी प्रत्येक फेरीचे वेळापत्रक काळजीपूर्वक पहावे व समजून घ्यावे.

48. **इयत्ता अकरावी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास पुन्हा अकरावी प्रवेशासाठी अर्ज करता येईल काय? कसा?**

इयत्ता ११ वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला त्याच शाळेमध्ये अथवा अन्यत्र ११ वी मध्ये नव्याने पुन्हा प्रवेश घ्यावयाचा असल्यास, अन्य विद्यार्थ्यांप्रमाणे Previously Passed म्हणून अर्ज भरता येईल. प्रवेशावेळी इयत्ता १० वी चे गुणपत्रक व इयत्ता ११ वी चा शाळा सोडल्याचा दाखला अशा पद्धतीने लागू कागदपत्र पडताळून प्रवेश देता येईल.